# कुंभमेळा

नाशिकमध्ये सध्या कुंभमेळा भरलेला आहे. गुरू सिंह राशीत असताना गोदावरी नदीत स्नान करण्याचे मोठेच पुण्य मानले आहे. त्यात ग्रहांच्या निरनिराळ्या स्थितीवरून अधिक महत्त्वाचे असे पर्वकाल असतात. त्या वेळी त्र्यंबकेश्वरला कुशावर्तात आणि नाशिकला रामकुंडात स्नान करण्याचे जास्त महत्त्व समजले जाते.

गुरू ग्रहाच्या स्थानावरून ठरावीक कालांतराने उज्जैन, प्रयोग व हरिद्वार येथेही नाशिक-त्र्यंबकेश्वरसारखाच दर बारा वर्षांनी कुंभमेळा भरत असतो. १९९२ ला उज्जैनमध्ये कुंभमेळा भरलेला असताना, मी त्या वेळी भोपाळला असल्याने आम्ही जाऊ शकलो होतो. क्षिप्रा नदीत त्या दिवशीच्या पर्वकालात १६ लाख लोकांनी स्नान केले. या वर्षीच्या सर्व पर्वण्या मिळून गोदावरीच्या दोन कुंडात स्नान करणाऱ्यांची एकूण संख्या ६० लाखांच्या आसपास जाईल, असा अंदाज आहे.

मूळ कल्पना अशी आहे, की प्रत्येक कुंभपर्वाला त्या त्या तीर्थक्षेत्री जाऊन आतापर्यंत केलेल्या पाप-पुण्याचा झाडा द्यायचा आणि पुढच्या पर्वापर्यंत कोणती व्रते आणि त्याग करणार त्याचा उच्चार करायचा. हा संकल्प टिकविताना काही वेळा साधनेत खंड पडतो. वावगी वर्तणूकसुद्धा होऊ शकते, या साऱ्या पापांचा झाडा पुढच्या कुंभपर्वात द्यायचा. तिथे जमणाऱ्या श्रुतिसंपन्न निष्काम विद्वानांबरोबर ज्ञान, कर्म व भक्ती या मार्गांची, वैराग्य साधनेची चर्चा करायची. अनुभवांची देवाणघेवाण करायची. एकंदर पुण्याईत मोठ्या प्रमाणात भर टाकणारा कार्यक्रम असतो.

मुद्दा असा की गोदावरी, क्षिप्रा, गंगा, यमुना या नद्या खऱ्या पवित्र आहेत. त्या पाप धुऊन टाकतात, यात शंकाच नाही; पण साधकांची आणि साधूंची. कारण त्यांची पापं अनवधानानं घडत असतात. संधिसाधूंची पापं त्या धूत नाहीत. त्यांना पश्चात्ताप, प्रायश्चित्त, परत पाप न करण्याचा दृढसंकल्प हे जिथे दिसेल तिथे त्या पापक्षालनाचे काम व्यवस्थित करीत असतात. पाप करण्यात आनंद आणि धन्यता मानणाऱ्यांची पापं त्यांनी काय म्हणून धुवायची ? माता असल्या म्हणून काय झालं ? ताळ सोडलेल्या पुत्राला त्या रोगराईची शिक्षासुद्धा देऊ शकतात, नव्हे देतातही !

शास्त्रचर्चा करण्यासाठी निष्काम आणि श्रुतिसंपन्न विद्वानांचा शोध घेणं फार अवघड जाणार आहे. सर्वसंगपरित्याग करून भगवी वस्त्रं धारण करणारांचे आखाडे आणि त्यांचे पीठाधीश गुरू यांचं वागणं संभ्रमात टाकणारंच वाटतं. त्यांचे शिष्यगण तर विचारायला नको. निष्काम मंडळी सोयीसुविधा नाहीत म्हणून तक्रार करतात तेव्हा नवल वाटतं. सर्वांचे अहंकार पोसण्याचे काम भक्त मंडळी करतच असतात. 'ओम शांतिः शांतिः शांति' असा उद्‌घोष करणाऱ्या आपल्या संस्कृतीच्या या पापक्षालनाच्या एवढ्या मोठ्या मेळ्यात शांती राहावी म्हणून पोलिसांनाच केवळ आटापिटा करावा लागतो. आता या लक्षावधी लोकांत काही खरंच प्रामाणिक साधक असणारच. कुंभमेळ्याला जे बाजारू स्वरूप आले आहे त्यामुळे त्यांचं चित्त तरी आपल्या साधनेपासून विचलित होऊ नये, अशा शुभेच्छा आपण व्यक्त करू या. अर्थात ते कार्य माता गोदावरी उत्तम प्रकारे करीलच, तरीही !

---

**– भीष्मराज बाम**

**('मना सज्जना' या पुस्तकातून)**